धक्का!! सुराज्य सोलापूर
गुरुवार, दि. २१ मार्च २०२४ । पान १२

# मतदार संघ १ पर्याय मात्र २



✔ निसार तांबोळी/सांगोला

**माढा मतदार संघातील लोकसभा निवडणुकीचे जोरकस पडसाद सांगोला विधानसभा मतदार संघात उमटत आहेत. या निवडणुकीत स्व. गणपतराव देशमुख गटाची काय भूमिका राहणार? हा मुद्दा अत्यंत महत्वाचा मानला जात आहे. धैर्यशील मोहिते-पाटील आखाड्यात नसतील तर शेकापचा उमदेवार आखाड्यात असेल, अशी भूमिका देशमुख गटाने समोर केली आहे. विशषत्वे, डॉ.अनिकेत देशमुख यांना माढा लोकसभेची तर डॉ. बाबासाहेब देशमुख यांना सांगोला विधानसभेची उमेदवारी देण्याच्या पार्श्वभूमीवर, त्यांच्यामधील उफाळलेला वाद मिटविण्याचे प्रयत्न सुरु आहेत.**

आगामी सांगोला विधानसभा निवडणुकीसाठी स्व. गणपतराव देशमुख यांचे नातू डॉ. बाबासाहेब देशमुख व त्यांचे दुसरे नातू डॉ. अनिकेत देशमुख यांच्यात उमेदवारीवरून राजकीय संघर्ष उफाळून आला आहे. त्यामुळे दोघातील वाद मिटविण्यासाठी शेकापचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी माढा मतदारसंघातून डॉ. अनिकेत देशमुख यांना उमेदवारीची मागणी केली आहे. तर डॉ. बाबासाहेब देशमुख यांना पुढे विधानसभेला संधी देण्याचा विचार असल्याची चर्चा सुरू आहे. शिवाय माढा मतदार संघांमध्ये इंडिया गटबंधनतर्फे कोणाला उमेदवारी मिळते? याकडे अवघ्या तालुक्याचे लक्ष लागले आहे.





लोकसभा निवडणूक जाहीर झाली आहे. गेली दोन महिने शरद पवार राष्ट्रवादी गट, शेकाप, शिवसेना ठाकरे गट असे इंडिया गटबंधन झाले आहे. इंडिया गटबंधन कडून माढा लोकसभेसाठी शेकापने जागा मागितली आहे. त्या दृष्टीने डॉ. अनिकेत देशमुख यांना उमेदवारी मिळावी म्हणून शेकापचे प्रांतिक सरचिटणीस जयंत पाटील प्रयत्नशील आहेत.

भाजपाकडून विद्यमान खासदार रणजित नाईक-निंबाळकर यांना उमेदवारी जाहीर झाल्याने भाजपामधला मोहिते-पाटील गट पूर्णपणे नाराज आहे. मोहिते-पाटील गटाकडून धैर्यशील मोहिते-पाटील गेली तीन वर्ष सातत्याने माढा मतदारसंघांमध्ये काम करीत आहेत. भाजपकडून उमेदवारी निश्चित मिळेल, असे वाटत असतानाच त्यांना डावल्याने नाराजी असून धैर्यशील मोहिते-पाटील हे हातात 'तुतारी' घेतात का याकडे सांगोला तालुक्यातील नागरिकांचे लक्ष आहे. आज धैर्यशील मोहिते-पाटील यांचा सांगोल तालुक्यात दौरा झाला. जर धैर्यशील मोहिते-पाटील यांना राष्ट्रवादी शरद पवार गटातर्फे उमेदवारी मिळाली तरी शेकाप मोहिते-पाटील यांच्या प्रचारासाठी जीवाचे रान करील, अशी भूमिका या पक्षाची आहे. शेकाप पक्षाने देशमुख यांना उमेदवारी नाही मिळाली म्हणून कधी बंडखोरी केलेली नाही. शेकाप हा तत्वाचे राजकारण करणारा पक्ष असून संधी साधूपणाचे राजकारण त्यांच्याकडे नाही त्यामुळे जर धैर्यशील मोहिते-पाटील यांनी लढण्याला नकार दिला तर शेकापचे डॉ. अनिकेत देशमुख मैदानात उतरण्याची तयारी केली आहे.

### खासदार रणजितसिंहाची प्रचारात आघाडी

इंडिया गटबंधन कडून रासपाचे महादेव जानकर, करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील, डॉ. अनिकेत देशमुख, धैर्यशील मोहिते-पाटील, अभिजित भोसले आदींची नावे चर्चिली जात आहेत. आताय यापैकी कोणाला उमेदवारी मिळते यावरच निवडणुकीची रणधुमाळी समजून येऊ शकते, अन्यथा आज तरी भाजपचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे, असे दिसते.



## आंदोलनाचे राजकारण

बारामतीत अजित पवार यांच्या कार्यकर्त्यांनी अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार यांना गेराव घातला.अजित पवार यांची बदनामी थांबवा अशी मागणी केली. तर सांगोल्यता महिते पाटील यांच्या गाडीवर गाजरे फेकून आंदोलन करण्यात आले. असेच आंदोलन खासदार रामराजे निंबाळकर यांच्याबाबतही करण्यात आले होते. त्यामुले यंदाची निवडणूक राज्यात मुध्यावरून गुद्यावर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या मुद्यांना मुयद्याने उत्तर देण्याऐवजी त्याला घेराव घालून अथवा आंदोलन करून त्याला कीती विरोध आहे हे दाखवण्याचा नवा फंडा यंदा राजकीय पक्षांकडून वापरण्यात येत असल्याचे मत राजकीय निरीक्षक व्यक्त करत आहेत.

## उमेदवारीची आस प्रचाराचा ध्यास



**लोकसभा निवडणुकीचे पडसाद पंढरपूर विधानसभेच्या मतदार संघात तीव्रपणे उमटत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, सर्वच प्रमुख पक्षाचे नेते, पुढारी तसेच प्रमुख कार्यकर्ते ॲक्शन मोडवर आहेत. काँग्रेस आणि भाजपा या दोन्ही पक्षांची उमेदवारी कोणाला मिळणार? याबद्दल संबंधित पक्षांच्या सर्वानाच आस लागून राहिली आहे. तर पंढरपूर तालुक्याच्या सर्वागीण विकासचा ध्यास असलेला उमेदवार द्यावा, अशी तालुक्यातील नागरिकांची मागणी आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने, तालुक्यातील नेते प्रशांत परिचारक, कल्याणराव काळे, अभिजित पाटील, भगीरथ भालके आदी नेतेमंडळींची भूमिका महत्वाची राहणार आहे.**

सोलापूर लोकसभा मतदारसंघात पंढरपूर तालुक्यातील २२ गावे व पंढरपूर शहर तसेच मंगळवेढा शहर व संपूर्ण तालुक्याचा म्हणजेच पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघाचा समावेश आहे. या मतदारसंघात भाजप आमदार समाधान आवताडे व भाजप लोकसभा प्रभारी प्रशांत परिचारक यांचे वर्चस्व आहे. त्यामुळे सोलापूर लोकसभेसेठी जो उमेदवार भाजप पक्षश्रेष्ठी ठरवतील त्या उमेदवारासाठी काम केले जाणार आहे. त्यामुळे पंढरपूर-मंगळवेढ्यात तरी भाजपची मतदानाची टक्केवारी जास्त आहे सोलापूर लोकसभेसाठी असलेल्या पंढरपूर शहर व २२ गावांमध्ये सध्या भाजपचे प्रशांत परिचारक राष्ट्रवादीचे कल्याणराव काळे बीआरएसचे भगीरथ भालके शरदचंद्रजी पवार गटाचे अभिजि पाटील या नेत्यांचे वर्चस्व पाहायला मिळते. यातील अभिजित पाटील सोडले तर बाकीचे सर्व नेते हे युतीच्या बरोबरीने असल्याने भाजपचे पारडे जड होईल का? याबाबत चर्चा आहे. सोलापूर लोकसभेसाठी पंढरपूर शहर व तालुक्यातील २२ गावे जोडली आहेत, तर माढा लोकसभेसाठी पंढरपूर तालुक्यातील ४२ गावांचा समावेश आहे. यामुळे दोन्ही जागांमधील उमेदवारांना पंढरपूर हे महत्त्वाचे असणार आहे. आघाडीने शिंदे यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केल्याची चर्चा आहे. त्यामुळे आ. प्रणिती शिंदे या मतदारसंघ पिंजून काढताना दिसत आहेत. मागील काही दिवसापासून त्यांनी पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील बऱ्याच गावांचा दौरा पूर्ण केलेला आहे. भाजपबरोबर देशात व राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी बरोबर आहे.

### तर नाईक-निंबाळकरांना लीड

माढा लोकसभेसाठी पंढरपूर तालुक्यातील जोडलेल्या ४२ गावांमध्ये ही सध्या संभ्रमाचे वातावरण आहे या ४२ गावांमध्ये प्रशांत परिचारक, संजय शिंदे , बबनराव शिंदे, मोहिते पाटील, अभिजित पाटील, असे अनेक राजकीय गट सक्रिय आहेत असून गेल्या लोकसभेला निंबाळकर यांना शिंदे बंधू कडून विरोध झाला होता यावेळेस मात्र शिंदे बंधू हे खासदार निंबाळकर यांच्याबरोबर आहेत तर मोहिते-पाटील सध्या स्थिती तर निंबाळकराला विरोध करत आहे ४२ गावांमध्ये निंबाळकर विरुद्ध मोहिते पाटील अशी लढत झाली तरच या गावांमध्ये चुरशीची मतदान होण्याची शक्यता आहे. जर मोहिते-पाटलांनी बंडखोरी केली नाही आणि ते जर भाजपा बरोबर राहिले, तर मात्र या ४२ गावांमधून खासदार निंबाळकर यांना विक्रमी मतदान होण्याचा अंदाज वर्तविला आला जात आहे.

### मराठ्यांच्या भूमिकेचे काय?

सध्या शांत असलेले मराठा आरक्षणाचे वातावरण कधी बिघडेल हे सांगता येत नाही. सध्या परिस्थितीत आचारसंहितेमुळे आंदोलनाला काही मर्यादा येत असल्या तरी मराठा आंदोलन येत्या लोकसभेच्या इलेक्शन मध्ये कुठे जाऊन थांबेल हे सांगता येणार नाही. लोकसभेसाठी मराठा समाजाकडून दाखल करण्यात येणाऱ्या उमेदवारी अर्जामुळे प्रशासनाची डोकेदुखी निश्चितच वाढणार आहे मराठा आरक्षणासाठी यापूर्वी समाजाने गावबंदी आंदोलन चालू केले होते परंतु आता गाव बंदी ऐवजी दार बंदी आंदोलन सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाहीत त्यामुळे येत्या काळात मराठा आरक्षणावर निर्णय नाही झाला तर माढा व सोलापूर मतदार संघातील चित्रे धक्कादायक पाहायला मिळाल्यास काही आश्चर्य वाटायला नका..

## रामराजे निंबाळकरांची आज ठरु शकते भूमिका

फलटण : माढा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर,ज्येष्ठ नेते तथा आमदार रामराजे नाईक-निंबाळकर यांनी आज दुपारी चार वाजता फलटण येथील अनंत मंगल कार्यालयात मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यासाठी फलटण, माण, खटाव, कोरेगाव (उत्तर) या तालुक्यातील प्रमुख नेतेमंडळी, पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. या मेळाव्यात समर्थकांच्या भावना ऐकून घेऊन रामराजे निंबाळकर हे महायुतीच्या धर्म पाळण्यातून विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचे काम करायचे का? याबद्दल आपली भूमिका स्पष्ट करतील असा अंदाज आहे. काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रामराजे निंबाळकर यांना महायुतीचा धर्म पाळून विद्यमान खासदार नाईक-निंबाळकर यांचे काम करण्याबद्दल सुचित केले होते. यावेळी रामराजे निंबाळकरांनी कार्यकर्त्यांशी चर्चा करुन सांगू असे सांगितले होते.पार्श्वभूमीवर निर्णय होऊ शकतो.



## मोहिते-पाटील कुटुंब रंगलय दौऱ्यात

✔ सांगोला, करमाळा, माढा/प्रतिनिधी

**माढा लोकसभेच्या उमदेवारीबद्दल नाराज झालेल्या अकलूजकर मोहिते-पाटील यांनी दौरे सुरु केले आहेत. काल केवळ धैर्यशील मोहिते-पाटील हे करमाळा दौर्यावर दिसले. तद्नंतर आज बुधवारी मोहिते-पाटील परिवारातील सदस्यांनी तीन तालुक्यात अनेक गावात दौरे काढत जनमत जाणून घेतले. विशेषत्वे, जनमत जाणून घेत असताना माढ्यातून आपण खासदारकी लढविण्यावर आहोत, याच्या मोर्चेबांधणीचा प्रयत्न ठेवणाऱ्या मोहिते-पाटील सदस्यांनी तुतारी चिन्ह घेऊन लढणार की अपक्ष याबद्दल मात्र स्पष्ट सांगितले नाही.हर हर महादेव'चा नारा देत त्यांनी त्यांच्या दौर्यांची मोहीम चालूच राहणार आहे. माढा मतदार संघाचे इच्छुक उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या लोकभावना दौर्यासाठी त्यांचे कुटुंबीयसुद्धा पुढे सरसावल्याचे दिसून आले. २०१९ च्या निवडणुकीत विद्यमान खासदार यांच्या प्रचाराची धुरा मोहिते-पाटील कुटुंबीयांनी सांभाळली होती. त्याचाच प्रत्यय आता येताना दिसत आहे. यामध्ये अर्जुनसिंह मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, सौ. शीतलदेवी धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आघाडी घेतल्याचा प्रत्यय येत आहे.**




### अर्जुनसिंह माण-खटावच्या मोहिमेवर

कधीही चर्चेत नसणारे परंतु, प्रत्येक कार्यात पडद्यामागे राहून जबाबदारी पार पाडणारे अर्जूनसिह मोहिते-पाटील हे आज माण खटाव या पश्चिम भागातील तालुक्याच्या दौर्यावर होते. वरकुटे-म्हसवड येथे अंकुश इंगळे यांच्या घरी तर देवापुर येथे शहाजी बाबर यांच्याकडे त्यांनी भेट देऊन धैर्यशीलभैय्या यांच्या माढा लोकसभेच्या निवडणुकीबद्दल चर्चा करत मोर्चेबांधणी करण्याचा प्रयत्न केला.

### शिवतेजसिंह माढ्याच्या प्रांतात

अकलूज ग्रामपंचायतचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी माळशिरस तालुक्यातील जी १४ गावे माढा विधानसभा मतदारसंघाला जोडलेली आहेत, त्या गावांसह संपूर्ण माढा तालुक्याची जबाबदारी स्विकारली आहे. त्यांनी माढा तालुक्यातील वाकाव येथे शिंदे गटाचे नेते प्रा. शिवाजीराव सावंत, माढा येथे माजी आमदार धनाजी साठे, माजी जि. प सदस्य आनंदराव कानडे, नगरसेवक शहाजी अण्णा साठे, राम काका मस्के, महादेव काका मस्के यांच्या घरी सदिच्छा भेट दिली.तर उंदरगाव कापसेवाडी, मानेगाव,धानोरे व कुर्डूवाडी येथील कार्यकर्ते व नेते मंडळींच्या घरी सदिच्छा भेटी दिल्याचे सांगण्यात आले.

### शीतलदेवी करमाळ्याच्या मुलूखात

लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने यापूर्वी माढा तालुक्यात गाठीभेटी व गावभेट दौरे यशस्वी केलेल्या सौ. शीतलदेवी मोहिते-पाटील जनभावना दौर्याच्या कालपासून करमाळा तालुक्याच्या दौर्यावर आहेत. श्री महादेव मंदिर, कोंढार-चिंचोली येथून त्यांनी गावभेट दौर्यास सुरुवात केली तर, कात्रज, टाकळी, कुंभारगांव , सावडी, दिवेगव्हाण, राजुरी, पोंधवडी, विहाळ या ठिकाणच्या विविध धार्मिक स्थळांना भेटी देत हरी हरी बाबा समाधी व अष्टभुजा देवी मंदिर, कोर्टी आदी ठिकाणी दौरे करुन खास महिला, युवती यांच्याशी चर्चा करुन धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या उमदेवारीबद्दल मोर्चेबांधणी केली.

### सांगोल्याच्या प्रांतात धैर्यशीलभैय्या

स्वतः धैर्यशील मोहिते पाटील यांनी सांगोला तालुक्यातील अनेक गावांचा दौरा केला. त्यांनी या दौर्यात वाकी येथील ऋषिकेश पाटील, सांगोला येथे सतीश सावंत, जि. प. माजी अध्यक्षा जयमालाताई गायकवाड यांच्या संपर्क कार्यालयाला, तसेच माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या घरी सदिच्छा भेट दिली. तर घेरडी, पारे, डिकसळ, हंगिरगे,वाणीचिंचाळे, वाकी, आलेगांव, मेडशिंगी, वाढेगांव येथे दौरा करुन माढा लोकसभेची निवडणूक लढण्याबद्दल भूमिका मांडली.

### धैर्यशीलभैय्यांचा साधव पवित्रा



सांगोला तालुक्याच्या दौर्यावर धैयशील मोहिते-पाटील यांनी आज प्रसार माध्यमांशी बोलताना अत्यंत सावध पवित्रा घेतल्याचे दिसले.निवडणुकीसंदर्भातील भूमिका काय? तुतारी हे चिन्ह घेऊन लढणार का? भाजपामधून उमदेवारी मिळाली त्याबद्दल नाराजी आहे का? अशा प्रश्नांचा भडिमार प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी त्यांच्यावर केला. मात्र, धैर्यशील मोहिते-पाटील यांनी अधिक बोलणे टाळले. कुंटुंबासह आम्ही माढा लोकसभेच्या मतदार संघात फिरत आहोत. नागरिकांचे जनमत जाणून घेत आहोत. माझे फिरणे पूर्ण होऊ द्या, मग मी माध्यमांशी बोलतो, भूमिका स्पष्ट करतो' एवढेच उत्तर त्यांच्याकडून प्रसारमाध्यमांना मिळाले.

### दौऱ्याला गालबोट; सांगोल्यात गाडीवर फेकली गाजरे

सांगोला : माढा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, गाठीभेटी घेण्यासाठी अकलूजकर धैर्यशील मोहिते-पाटील हे त्यांच्या समर्थकांसह बुधवारी सांगोला तालुक्याच्या दौऱ्यावर होते. तालुक्यातील दिवसभर अनेक गावांमध्ये त्यांनी भेट देत जनमत जाणून घेतले. दरम्यान रात्री उशीरा दौरा आटपून सांगोला मार्गे ते अकलूजकडे परत जात होते. यावेळी सांगोला येथे सकल मराठा समाजाच्या तरुणांनी त्यांच्या गाडीवर गाजरे फेकली. यावेळी उपस्थित सकल मराठा तरुणांनी निषेधाच्या घोषणा दिल्या.